# निराधारांच्या आधार : नसीमा हुरजूक

ताराराणी विद्यापीठातर्फे भद्रकाली ताराराणी पुरस्कार सामाजिक कार्यकर्त्या नसीम हुरजूक यांना देण्यात येत आहे. त्यानिमित्त...

कोल्हापुरात नसीमा हुरजूक यांचा जन्म झाला. वयाच्या सोळाव्या वर्षी अनपेक्षितपणे त्यांना अपघात झाला आणि दीदींना अपंगत्व आले आणि त्यांना चाकाच्या खुर्चीचा आधार घ्यावा लागला. पण खंबीर मनाच्या दीदींनी मन खचू दिले नाही. आपले शिक्षण सुरू ठेवून शिवाजी विद्यापीठाची अर्थशास्त्र विषयातील पदवी संपादन केली. सेंट्रल एक्साईज अँड कस्टम खात्यात उपअधीक्षक या पदावर त्यांची नेमणूक झाली. पण नोकरीत त्यांचे मन रमले नाही. दि हेल्पर्स ऑफ हॅण्डिकॅप्ड कोल्हापूर ही संस्था त्यांनी स्थापन केली.



आपल्या वैगुण्यावर मात करून समाजासमोर आदर्श व्यक्तीमत्व कसे निर्माण करता येते याचे उत्तम उदाहरण म्हणजे नसीमादीदी होय. दीदींनी समाजातील अनेकांच्या व्यक्तिमत्वाचा विचार करून त्यांच्यामध्ये आत्मबल निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे. कै. एन. डी. दिवाण यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन त्यांनी १९८४ मध्ये हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ड या संस्थेची स्थापना कोल्हापुरात केली. या संस्थेची कामगिरी गौरवपूर्ण आहे. संस्थेने आजवर १६७१५ हून अधिक अपंग व्यक्तींना गेल्या २६ वर्षांत सहा कोटी रूपयांहून अधिक सेवासाहाय्य पुरविले आहे संस्थेचे वसतिगृह अतिशय शांत वातावरणात वसलेले आहे. तेथील शिस्त, मुलांचा उत्साह कौतुकास्पद आहे.

संस्थेच्या पुनर्वसन आणि प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षणाचा लाभ मिळत आहे. मुले उच्च ध्येय घेऊन ज्ञानआराधना करत आहेत. प्रात्यक्षिकातील कौशल्य, निटनेटकेपणा स्वच्छता, स्वयंशिस्त, विविध कलागुणांचा झालेला विकास, शालेय स्पर्धेतील सहभाग, स्वावलंबन वृत्ती या सर्वच गोष्टी थक्क करणाऱ्या आहेत.

संस्थेची व नसीमा हुरजूक यांच्या कार्याची दखल देशातील आणि परदेशातील विविध संस्थांनी घेऊन त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानीत केलेले आहे. साठहून अधिक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. केंद्र सरकारचा सामाजिक न्याय तथा सबलीकरण मंत्रालयाकडून २००१ सालासाठीचा रोल मॉडेल पुरस्कार, इचलकरंजीच्या फाय फौंडेशनचा पुरस्कार, सवित्रीबाई फुले पुरस्कार, सहयोग फौंडेशन पुरस्कार, बाया कर्वे पुरस्कार, संघर्ष सन्मान पुरस्कार, कोल्हापूर भूषण, केविन केअर ॲबिलिटी पुरस्कार, फिक्की पुरस्कार, स्पीक आऊट पुरस्कार, शेल हेलन केलर पुरस्कार आदींचा यात समावेश आहे.

त्यांचे 'चाकाची खुर्ची' हे आत्मकथनपर पुस्तक प्रसिध्द आहे. याचे इंग्रजी, गुजराथी, तेलगू, कन्नड, हिंदी या भाषांमध्ये भाषांतरे झाली आहेत. विविध संस्थांतही त्यांचा सहभाग राहिलेला आहे. शिवाजी विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्राच्या सल्लागार समितीच्या सदस्या, रोटरी क्लब ऑफ सिटी कोल्हापूर, समाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालय, भारत सरकारच्या तीन सदस्यिय जिल्हा स्तरीय स्थानिय समिती सदस्या, भारत सरकारच्या सामाजिक न्याय तथा सबलीकरण मंत्रालयाच्या सदस्या म्हणून सहभाग महत्त्वपूर्ण ठरत आहे. हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ड कोल्हापूर या संस्थेचा कार्यविस्तार वाढत असून, कोल्हापूर बरोबरच सिंधुदुर्ग जिल्ह्यात संस्थेचे कार्य केंद्रे असून, पश्चिम, दक्षिण महाराष्ट्र, कोकण, उत्तर कर्नाटक आणि गोव्यातील अपंगांना सुविधांचा लाभ होत आहे.

हुरजूक यांच्या सेवाभावी कार्याची दखल ताराराणी विद्यापीठाने घेऊन २०१२-१३ सालचा भद्रकाली ताराराणी पुरस्कार त्यांना जाहीर केलेला आहे.

– प्रा. अनिल घस्ते, कोल्हापूर

Scanned by CamScanner